# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

क्रमांकः२अ/एडीएम/२००८/१८१५
दिनांक : २.७.२००८

प्रति,
सर्व सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर

विषय : राज्यातील अल्पसंख्यांक (भाषिक/धार्मिक) दर्जा असलेल्या मान्यताप्राप्त महाविद्यालयांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याबाबत....

संदर्भ : १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टिईएम २००८/(५३/०८)/तांशि-१, दिनांक ५.४.२००८
२) सामान्य प्रशासन विभागाचे अ.शा.पत्र क्रमांक न्यायाप्र २००८/प्र क्र ३१/२००८/३५, दिनांक १७.४.२००८

शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी संचालनालयाच्या वतीने राज्यातील मान्यताप्राप्त विनाअनुदानीत अल्पसंख्यांक महाविद्यालयांना संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/अल्पंख्यांक/२००८/१८०४, दिनांक २७.६.२००८ अन्वये दिलेल्या सूचना रद्द समजण्यात याव्यात. त्याऐवजी संदर्भाधीन क्रमांक १ व २ मधील शासनाच्या सोबत जोडलेल्या पत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

सही/-
( डॉ.एस के महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

**महाराष्ट्र शासन**

क्र. टिईएम २००८/(५३/०८)/तांशि-१
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ५ एप्रिल, २००८.

प्रति,
संचालक (तंत्र शिक्षण),
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : **सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ११.६.२००७ च्या शासन निर्णयाबाबत.**

संदर्भ : आपले पत्र क्र. २अ/एडीएम/अल्पसं./००८/३७०, दि. २९.१.२००८.

अल्पसंख्यांक संस्था स्थापन करण्यासाठी शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११.६.२००७ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित केले होते. या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१२/२००७ वर निकाल दिला असून सामान्य प्रशासन विभागाचा सदर शासन निर्णय under review ठेवण्यात आलेला आहे. तरी या प्रकरणी सद्य:स्थितीत अल्पसंख्यांक संस्थांमधील अल्पसंख्यांक कोटयाच्या प्रवेशासाठी कोणत्या अटी व शर्ती लागू राहतील, याची माहिती/शासन निर्णय उपलबध करुन घ्यावी, अशी विनंती आपण आपल्या संदर्भाधीन पत्रान्वये केली आहे.

२. या संदर्भात आपणास असे कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी असोसिएट ॲडव्होकेट जनरल यांच्या दिनाक ७.२.२००८ च्या अभिप्रायांचे कृपया अवलोकन व्हावे. त्यानुसार अल्पसंख्याक संस्थांमधील प्रवेश कोटा तसेच अल्पसंख्यांक संस्थांच्या गुणवत्ता याद्यांची पडताळणी, याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालयाने सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक ११.६.२००७ चा शासन निर्णय अवैध ठरविला नसून तो under review ठेवण्यात आलेला आहे. म्हणून या प्रकरणी दिनांक ११.६.२००७ पूर्वी अस्तित्वात असलेला शासन निर्णय, अधिनियम, विनियम, इत्यादी बाबी लक्षात घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करणे योग्य ठरेल.

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

C:\Documents and Settings\m\My Documents\Lole\TE१\Letter\Minority status.doc

अ.शा.पत्र क्रमांकःन्यायाप्र-२००८/प्र.क्र.३१/२००८/३५
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १७.४.२००८.

श्रीमती टी.एफ. थेक्केकरा
प्रधान सचिव

प्रिय

आर.आर. एज्युकेशन ट्रस्ट व इतर यांनी रिट याचिका क्र.२२१२/२००७ अन्वये शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.११ जून, २००७ द्वारे राज्यातील अल्पसंख्याकांना त्यांच्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता विहित केलेल्या निकष, अटी व कार्यपध्दतीस मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. ही याचिका दि.१२ ऑक्टोबर, २००७ रोजी मा.उच्च न्यायालयासमोर सुनावणीस आली असता, राज्य शासनामार्फत सदर प्रक्रियेचा आढावा घेण्यात येईल, असे विधान करण्यात आले आहे.

राज्य शासनामार्फत मा.उच्च न्यायालयात घेण्यात आलेल्या उपरोक्त भूमिकेस अनुसरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.११ जून, २००७ ची अंमलबजावणी सद्यस्थितीत आस्थगित ठेवण्यात आली असून सदर शासन निर्णयामध्ये करावयाच्या सुधारणाबाबत संबंधित विभागांशी विचारविनिमय करण्यात येत आहे.

तथापि या प्रक्रियेस काही कालावधी लागणे अपेक्षित असल्याने दरम्यानच्या कालावधीत राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांद्वारे संचलित करण्यात येत असलेल्या विविध अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया नियमित होत नसल्याने त्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सदर बाब लक्षात घेवून शैक्षणिक वर्ष २००७-०८ साठी अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाद्वारे संचलित करण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.११ जून, २००७ मधील तरतूदीनुसार न करता यापूर्वी शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग या विभागांनी अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक म्हणून दर्जा देण्याबाबत विहित केलेल्या तरतूदीनुसार करण्यात यावी. तसेच असे करतांना अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले न्याय निर्णय देखील विचारात घेण्यात यावेत.

आपली स्नेहांकित,

टी एफ थेक्केकरा

(टी. एफ. थेक्केकरा)

श्रीमती जॉयस शंकरन,
अपर मुख्य सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

श्री.अमिताभ चंद्र,
प्रधान सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

श्रीमती शर्वरी गोखले,
प्रधान सचिव,
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

श्री.अरुमुगम,
सचिव,
सामाजिक न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत,

मा.मंत्री, वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार. टी एफ थेक्केकरा